# १

# सर्व समर्थ देव अस्तित्वात आहे काय?

कोणतेही घर हे पायांपेक्षा मजबूत नसते. घर ज्या पायावर टिकलेले असते, त्या पायाचा परिणाम त्याच्या वेगवेगळ्या भागांवर नक्कीच होतो.

जसा घराचा 'पाया' महत्त्वाचा आहे, तसेच ''सर्वशक्तिशाली परमेश्वर अस्तित्वात आहे काय?'' हा प्रश्न जीवनासाठी महत्त्वाचा आहे. परमेश्वरावर आपला विश्वास असणे किंवा नसणे आपल्या विचारांचा आधार बनतो. ज्यामुळे जीवनाबद्दल आपल्या सर्व विचारांना अर्थ प्राप्त होतो, अर्थात त्याची व्याख्या तयार होते.

म्हणून सर्वांत सखोल प्रश्न, जो कोणीही विचारेल तो हा की, ''परमेश्वर अस्तित्वात आहे काय?'' हा प्रश्न इतका महत्त्वाचा असण्याचे कारण म्हणजे या प्रश्नाचे जे उत्तर मिळेल त्यामुळे जीवनातील सर्व प्रश्नांची उत्तरे प्रभावित होतील.

उदाहरणार्थ आपण मानू या की एखादी व्यक्ती या प्रश्नाचे उत्तर, ''नाही, परमेश्वराचे कोणतेच अस्तित्व नाही,'' असे देईल. तसेच ''मी या जगात कसा जगेन?'' या प्रश्नाचे उत्तर ती व्यक्ती ''मला आवडेल तसे मी जगेन. शेवटी, कोणा उच्च पदावरील व्यक्तीला जबाबदार राहण्यासाठी मला थोडेच निर्माण करण्यात आले आहे? माझे काम केवळ हे आहे की मी आपल्या मित्रांच्या आनंदासाठी आणि विकासासाठी जोपर्यंत जमेल तोपर्यंत त्यांची मदत करू शकेन. त्यानंतर माझ्या जीवनाबद्दल काय करायचे हे सर्वस्वी माझ्यावर अवलंबून आहे. कारण मी माझ्या मृत्यूनंतर जगणार नाही, म्हणून या जीवनातच जितके भरपूर जगून जितका आनंद मिळेल तितका कवटाळून जगेन,'' असे देईल.

आता असे मानू या की एक व्यक्ती ''सर्व शक्तिशाली परमेश्वर अस्तित्वात आहे काय?'' या प्रश्नाचे उत्तर ''होय, परमेश्वराचे अस्तित्व आहे,'' असे मानून देतो, तेव्हा ''या जगात मी कसा जगेन?'' या प्रश्नाचे त्याचे उत्तर एकदमच वेगळे असेल.

या प्रश्नाच्या उत्तरात तो असे म्हणेल, ''मला सर्वशक्तिशाली परमेश्वराने तयार केले आहे. मला बनवण्यामागे त्याचा स्पष्ट उद्देश होता आणि माझ्यासाठी हे आवश्यक आहे की मी त्या उद्देशाचा शोध घेईन. केवळ त्याची इच्छा जाणून आणि त्याच्यानुसार जीवन व्यतीत करूनच मला शांती व जीवनाचा उद्देश मिळतो. जो उत्पन्नकर्त्याने माझ्या जीवनासाठी इच्छिला होता. मला माहीत आहे की, एक दिवस तो मला त्याच्याजवळ बोलावील आणि त्याच्या सृष्टीत मी माझे जीवन कसे व्यतीत केले याबाबतीत माझ्या सगळ्या कर्मांचा हिशेब मला त्याला द्यावा लागेल.''

''सर्वशक्तिशाली परमेश्वर अस्तित्वात आहे काय?'' या प्रश्नावर आपण लक्षपूर्वकविचार करू. परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्यासाठी कोणती गोष्ट आड येत आहे का? पवित्र शास्त्र, परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल वादविवादातून सुरूवात करत नाही. वास्तविक पाहिल्यास परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल एक पुष्टी करते की परमेश्वरासोबत प्रारंभ होतो. ''प्रांरभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली'' (उत्पत्ती १:१) परंतु, परमेश्वर देवाच्या अस्तित्वाबद्दल युक्तीसंगत प्रमाण संपूर्ण पवित्र शास्त्रात विस्तृत पसरलेले आहेत. काही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपात तर काही स्पष्ट स्वरूपात लिहिले गेले आहेत आणि काहींचा संकेत केला गेला आहे. या सर्वांचा निष्कर्ष काढण्यासाठी खालील दोन कारणांचा विचार करू या. जर तुम्ही या दोन कारणांचा खोलवर विचार कराल तर निश्चितच परमेश्वर देवाचे अस्तित्व आहे यावर दृढ विश्वास ठेवाल. त्यामुळे आपणांस दृढता प्राप्त होईल.

## जगताचे प्रमाण

देव खरोखरच अस्तित्वात आहे असा विश्वास ठेवण्यास आपल्याला बाध्य करणारा पहिला पुरावा हा आपल्या आजूबाजूच्या, सभोवतालच्या जगातून आपल्याला मिळतो. हे जग आणि विश्व देवाच्या अस्तित्वाची घोषणा अतिशय वक्तृत्वपूर्ण रीतीने करते.

आपण पृथ्वी नावाच्या ग्रहावर राहतो. सूर्याभोवती फिरणाऱ्या एका सूर्यमालेचा ती एक भाग आहे. या सूर्यमालेची रचना आणि संकल्पना परिपूर्ण आहे. सर्व ग्रह आपापल्या कक्षेत फिरतात, ते कधीही एकमेकांवर आदळत नाहीत. ते सर्व योग्य गतीने आणि योग्य अंतरावरून फिरत असतात. पृथ्वी आणि सूर्य यांच्यातील परस्परसंबंधांमुळे दिवस, रात्र, आणि ऋतू निर्माण होतात. ती सूर्यापासून नेहमी योग्य अंतरावर असते. आपण जर सूर्यापासून थोडे अधिक दूर असतो, तर गोठून गेलो

असतो, आणि थोडे जवळ असतो, तर उष्णतेने जळून, करपून गेलो असतो.

आपल्या सूर्यमालेशिवाय इतर अनेक सूर्यमालिका या अनंत विश्वात आहेत असे शास्त्रज्ञ सांगतात. आपल्याला खऱ्या अर्थाने सृष्टीच्या भव्यतेची माहिती नाही. आपल्या दुर्बिणी आपल्याला या विश्वाच्या कडा दाखवू शकत नाहीत. आपली मने या विश्वाची भव्यता समजू शकत नाहीत. या विश्वासंबंधी पुष्कळशा गोष्टी जरी आपल्याला माहीत नसल्या, तरी एक गोष्ट मात्र आपल्याला निश्चितपणे मान्य आहे, आणि ती म्हणजे या विश्वाची मांडणी अतिशय नियमबद्ध पद्धतीने, सुव्यवस्थित रीतीने करण्यात आली आहे. ती अव्यवस्थित, विस्कळीत नाही, तर एकसूत्रित आणि संघटित, सुव्यवस्थित अशी आहे.

या विश्वाचे अस्तित्व आपल्याला पुढील दोनपैकी एक निष्कर्ष काढण्यास बाध्य करते : एक तर ते निर्माण करण्यात आले आहे किंवा आपोआप तयार झाले आहे. विश्व असेच अचानक, आपोआप घडले असे जर कोणी म्हणत असेल तर विश्वाची उत्पत्ती शून्यातून झाली किंवा अगोदर अस्तित्वात असलेल्या कोणत्या तरी घटकांच्या स्फोटातून ते अस्तित्वात आले असा निष्कर्ष त्याने काढला पाहिजे. दोन निष्कर्षांपैकी केवळ एकच निष्कर्ष योग्य किंवा सयुक्तिक वाटतो, तो म्हणजे हे विश्व निर्माण करण्यात आले आहे. विश्व शून्यातून निर्माण झाले असा ठाम विश्वास आपण कसा काय बाळगू शकतो? मोठ्या वैश्विक स्फोटामधून विश्वाची निर्मिती झाली, आणि केवळ मूलद्रव्येच प्रारंभापासून अस्तित्वात आहेत हे आपल्याला तर्कसुसंगत कसे काय वाटू शकते?

समजा, एक मनुष्य माझ्याकडे एक पुस्तक घेऊन आला. माझ्या हातात ते पुस्तक देऊन त्याने ते मला बघायला सांगितले. मी ते पाहू लागलो. पुस्तकाचे नाव ‘‘क्रुडन्स कंप्लिट कन्कॉर्डन्स’’ हे माझ्या लक्षात आले. तसेच ‘‘झोंडरवन’’ ने हे पुस्तक प्रकाशित केले हेही माझ्या लक्षात आले. पुस्तकाची पाने मी चाळली तेव्हा त्यात इंग्रजीतल्या केजेव्ही बायबलमधील निरनिराळी नावे, ठिकाणे आणि वाक्यप्रयोग आणि बायबलमध्ये ते शब्द किंवा ठिकाणे कोणकोणत्या ठिकाणी आहे त्यांचे संदर्भ वर्णमालेच्या क्रमानुसार दिली आहेत हे समजले. पुस्तकात २,००,००० पेक्षा जास्त संदर्भ दिले आहेत असे मुखपृष्ठावर छापल्याचे माझ्या पाहण्यात आले. मी त्या माणसाला म्हणेन, ‘‘या पुस्तकाच्या प्रकाशकांशी संपर्क साधून माझ्यासाठीसुद्धा एक प्रत मिळवण्याचा प्रयत्न मी करीन.’’

तेव्हा तो मनुष्य मला म्हणेल, ‘‘तुम्ही या पुस्तकाची प्रत विकत घेऊ शकत

नाही, कारण हे पुस्तक झोंडरवनने प्रकाशित केले नाही, किंवा अलेक्झांडर क्रुडनने ते संकलित केलेले नाही. ते आपोआप तयार झाले आहे. हे आहे असेच परिपूर्ण स्थितीत आम्हाला सापडले. ते शून्यातून निर्माण झाले आहे.'' तेव्हा मी त्या गृहस्थाला म्हणेन, ''इंग्रजी बायबलमधील ही सर्व नावे, सर्व ठिकाणे आणि वाक्प्रचार कोणीच संकलित केलेले नाहीत असे तुम्ही मला सांगत आहात का? २,००,००० पेक्षा जास्त संदर्भ शून्यातून अस्तित्वात आले असे सांगायचा प्रयत्न तुम्ही करत आहात का? या पुस्तकाची अक्षरजुळणी, छपाई, बांधणी काहीच झालेली नाही असे तुम्ही म्हणत आहात का?''

तो मनुष्य म्हणेल, ''होय, मी तेच सांगायचा प्रयत्न करत आहे.'' त्यावर मी त्याला म्हणेन, ''तुमची मोठी दिशाभूल झाली आहे हे मला माहीत आहे. एक व्यक्ती म्हणून मी तुमचा सन्मान करतो, पण या पुस्तकाच्या उगमाविषयी तुम्ही मला जे सांगत आहात त्यावर माझी तर्कबुद्धी मला विश्वास ठेवू देत नाही. हे पुस्तक आपोआप तयार झाले नाही हे निर्भीडपणे सांगू शकतो.'' त्या माणसाला मी ठामपणे हे उत्तर देऊ शकतो, कारण पुस्तकाच्या मुळाविषयी किंवा उगमाविषयी दुसरा कोणताही निष्कर्ष मान्य करण्याची मुभा माझी तर्कबुद्धी अजिबात देत नाही.

समजा दुसऱ्या एका माणसाने माझ्याकडे येऊन एक रेडिओ दिला. त्या माणसाने मला म्हटले, ''हा रेडिओ तुम्ही पाहावा असे मला वाटते. या रेडिओला विजेची तार (वायर) जोडता येईल, आणि विजेच्या शक्तीने तुम्ही हा रेडिओ चालू करून ऐकू शकाल. रेडिओच्या आत बॅटरी आहे. विजेची तार रेडिओला जोडली जाते तेव्हा ही बॅटरी चार्ज केली जाते. अशा प्रकारे जेथे विजेची सोय नसेल, तेथे तुम्ही बॅटरीच्या आधारे रेडिओ चालू करू शकता. तुम्ही तो घरात किंवा घराबाहेर, प्रवास करत असतानासुद्धा ऐकू शकाल.'' तेव्हा मी त्या व्यक्तीला म्हणेन, ''ही तर फारच उपयोगाची वस्तू आहे. मी दौऱ्यावर जात असतो, आणि अशा प्रकारचा रेडिओ माझ्यासाठी फारच उपयोगी होईल. अशा प्रकारचे रेडिओ विकत घ्यायचा मी नक्कीच प्रयत्न करीन.''

समजा त्या माणसाने मला म्हटले, ''अरे नाही! असा रेडिओ विकत मिळत नाही. तो कोणी बनवला नाही, तो तर आपोआप तसाच तयार झाला आहे. येथून थोड्या अंतरावर एक कारखाना होता. तेथे प्लॅस्टिक, धातू, लाकूड इ. सर्व प्रकारचे साहित्य होते. काही आठवड्यांपूर्वी त्या इमारतीत स्फोट झाला. हे सर्व साहित्य वर हवेत फेकले गेले. वर हवेत असतानाच त्यातील काही घटक एकमेकांजवळ येऊन एकमेकांशी जोडले गेले, आणि या वस्तूच्या (रेडिओच्या) रूपात खाली जमिनीवर

पडले. त्या इमारतीच्या कचऱ्याच्या व मातीच्या ढिगाऱ्यात आम्हांला हा रेडिओ सापडला. कोणीही त्याची रचना केली नाही, कोणी तो तयार केला नाही; तर या स्फोटातून तो निर्माण झाला.'' तेव्हा मी त्या माणसाला म्हणेन की, ''त्या रेडिओची कुणी रचना केली नाही, त्याचे आतील बारीकसारीक संच बनवले नाहीत आणि मोठ्या सावधानतेने त्या संचाना जोडले नाहीत, यावर मी विश्वास मी ठेवावा असे सांगायचा प्रयत्न तू करीत आहेस काय? या रेडिओची बटने एक मात्र संयोग असेल. बुद्धीसोबत याचा काहीच संबंध नाही, असे तू मला सांगण्याचा प्रयत्न करीत आहेस काय?'' तर तो मनुष्य कदाचित हट्ट करेल की ''रेडिओबद्दल तुझी संकल्पना चुकीची आहे, कोणीही विद्वान व्यक्ती या प्रकारचा निष्कर्ष काढू शकत नाही.'' मी मानणार नाही की रेडिओ अशा प्रकारे बनला असेल व त्या माणसाला मी उत्तर देण्यासाठी संपूर्ण सकारात्मक राहील. तर्काने निष्कर्ष काढण्याची माझी योग्यता मला दुसरा कोणता निष्कर्ष काढण्यासाठी परवानगी देत नाही.

पुस्तक आणि रेडिओच्या संबंधात जो निष्कर्ष मोठ्या समजदारीने व दृढतेने आम्ही काढला आहे, तसाच निष्कर्ष आम्हांला या विश्वाबद्दल यापेक्षा जास्त दृढतेने काढायचा आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून कितीही व्याख्या असतील त्या आम्हांला असा पुरावा देत नाही की, ही पृथ्वी एका शून्यातून निर्माण झाली, किंवा ती कोणत्याही एका मोठ्या स्फोटाचा परिणाम नाही. विश्वाची एक पूर्वकल्पना व तिची निर्मिती, एका पुस्तकापेक्षा किंवा रेडिओपेक्षा किती तरी चांगल्या पद्धतीने केली गेली आहे. जर आपण हे मान्य करू शकत नाही की, एक पुस्तक असेच तयार झाले नाही किंवा एक रेडिओ कोणत्या तरी स्फोटाचा परिणाम आहे तर आपण हे कसे मान्य करणार की ही विश्वं एका शून्यातून किंवा एका निर्जीव पदार्थाच्या स्फोटातून परिणाम असेल? ज्या लोकांनी या विश्वाचा थोडा फार अभ्यास केला आहे, त्यांनी या बोधातून की विश्व एक कठीण संकल्पना आणि सत्यतेची आश्चर्यचकित करणारी वस्तू आहे. त्यांनी त्याच्या अभ्यासापासून दूर ठेवले.

या तर्कावरून आम्ही जो निष्कर्ष काढला, पवित्र शास्त्र त्याची पुष्टी करते. स्तोत्रसंहिता १९:१ मध्ये म्हटले आहे ''आकाश देवाचा महिमा वर्णिते; अंतरीक्ष त्याची हस्तकृती दर्शविते.'' दुसऱ्या शब्दामध्ये जेव्हा आकाश निरभ्र असते, तेव्हा आम्ही जमिनीवरून आकाशातील ताऱ्यांकडे बघावे, तेव्हा आपण अद्‌भुतरीत्या देवाच्या आराधनेमध्ये बसल्याची जाणीव आपल्याला होईल. आपल्या अगणित ताऱ्यांसोबत अंधकारीत आकाश प्रचार करीत असेल आणि आम्ही मंडळी असू. सभामंडप एक

गवताचा गालिचा असेल ज्यावर आम्ही बसू. शांततेने प्रचारक संपूर्ण मोठ्या भावपूर्ण पद्धतीने घोषित करीत असेल की आकाशातील तारे स्वतःहूनच अस्तित्वात आले नाहीत, परंतु त्यांची रचना करण्यात आली. तारकांनी भरलेले आकाश देवाचा महिमा वर्णन करील. या आराधनेनंतर आम्ही म्हणू, ''या प्रचारकाचा संदेश मी जो ऐकला तो सत्यच ऐकला आहे, माझी समजबुद्धी मला कोणी दुसऱ्याचा संदेश ऐकण्याची परवानगी देत नाही.''

पौल जो नवीन कराराच्या लेखकांपैकी एक होता, त्याने लिहिले ''त्याचे अदृश्य गुण म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवत्व ही निर्मिलेल्या पदार्थावरून ज्ञात होऊन सृष्टीच्या उत्पत्तीकालापासून स्पष्ट दिसत आहेत, यासाठी की त्यांनी निरुत्तर व्हावे'' (रोम १:२०) पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या वस्तू परमेश्वराला अदृश्य अलक्षित हाताच्या अस्तित्वाला (प्रामाणिक) पुरावा देत आहेत. ते त्याचे सर्वशक्तिशाली होण्याचे आणि त्याच्या अलौकिक स्वभावाबद्दल सांगते. परमेश्वराचे अस्तित्व हे सामान्य प्रकटीकरण, आपल्या अवतीभवतीचे जग व वरील जग यामध्ये दिसून येते. पौलानेसुद्धा म्हटले की, ''तथापि त्याने स्वतःच साक्षीविरहित राहू दिले नाही; म्हणजे त्याने उपकार केले, आकाशापासून पर्जन्य व फलदायक ऋतु तुम्हांस दिले, आणि आनंदाने व हर्षाने तुम्हांस तृप्त केले'' (प्रेषित १४:१७). आपली पृथ्वी व सर्व सृष्टी सर्वशक्तिमान परमेश्वर होण्याची साक्ष देत आहे.

मुलांच्या एका प्रसिद्ध गोष्टीमध्ये रॉबिन्सन क्रुसोचे जहाज बुडाले आणि तो एका ओसाड बेटावर अडकून पडला. जेव्हा तो कसाबसा समुद्राच्या किनारी पोहोचला आणि त्याने इकडे तिकडे बघितले आणि बाहेर नजर टाकली तेव्हा त्याने पाहिले की त्याचा एकसुद्धा साथीदार या दुर्घटनेत बचावला नाही. संपूर्ण द्वीपावर शोधूनसुद्धा त्याला त्याचे साथीदार सापडले नाहीत. या बेटावर आपण एकटेच आहोत असे त्याला वाटले. त्याने स्वतःसाठी लाकडांचे तुकडे तसेच झाडांच्या फांद्यांपासून घर बनवले. त्या बेटावर असलेल्या जंगली प्राण्यांची तो शिकार करू लागला. एके दिवशी समुद्राच्या किनाऱ्यावर फिरत असताना त्याला वाळूमध्ये दुसऱ्या माणसाच्या पायांचे ठसे दिसले. तीनपैकी कोणती तरी गोष्ट नक्कीची झाली असावे हे त्याच्या लक्षात आले : ज्या कोणाच्या पायाचे हे ठसे असतील तो मनुष्य आता त्या बेटावरून निघून गेला असेल, कदाचित तो मरण पावला असेल, आणि बेटावर कुठे ना कुठे तरी त्याचे मृत शरीर दिसेल, किंवा ज्याच्या पायाचे हे ठसे आहेत, तो अजून या बेटावर जिवंत असेल. आपल्याशिवाय अजून कोणी तरी जिवंत व्यक्ती या बेटावर आहे हे लक्षात

येऊन त्याला खूप आनंद झाला. या माणसाच्या शोधासाठी त्याने संपूर्ण बेट पालथे घातले. ज्या माणसाच्या पायांचे हे ठसे होते तो माणूस सरतेशेवटी एका शुक्रवारी त्याला सापडला. त्याने त्याचे नाव 'शुक्रवार' ठेवले कारण त्याच दिवशी तो सापडला होता.

आम्हीसुद्धा काही प्रमाणात या गोष्टीतील रॉबिन्सन क्रुसोप्रमाणेच आहोत. आमच्यासमोर पृथ्वी, तारे, सूर्य आणि चंद्र त्या पायांच्या ठशांप्रमाणेच आहेत. ही चिन्हे सर्वशक्तिशाली परमेश्वराची आहेत. ते ठसे पाहून जर क्रुसोने हा निष्कर्ष काढला असता की, ते कोणी एका शून्यापासून बनले आहेत तर तो मूर्ख ठरला असता. याच प्रकारे आम्ही जर तर्कज्ञानाची उपेक्षा करून निष्कर्ष काढला की, पृथ्वी अशीच आपोआप अस्तित्वात आली किंवा एका शून्यापासून बनली, तर तो आमचा मूर्खपणा ठरेल.

आपल्या आजूबाजूची आणि आमच्या डोक्याच्या वरची सृष्टी केवळ एकाच निष्कर्षाकडे संकेत करते आहे की, ही सृष्टी व तिच्यासमोरचे जे असेल या सर्वांगाने सर्व शक्तीमान परमेश्वरच आहे. बिलकुल तसेच जसे या गोष्टीमध्ये की एखादे पुस्तक शून्यापासून बनू शकत नाही आणि विद्युत रेडिओ कोणत्या तरी विस्फोटाच्या परिणामातून तयार होऊ शकत नाही.

## मनुष्याचे प्रमाण

दुसरे, मनुष्याच्या अस्तित्वाचे प्रमाणामुळे आपण निःसंकोचपणे विश्वास करू शकतो की खरोखरच परमेश्वराचे अस्तित्व आहे. मनुष्याचे अस्तित्व परमेश्वर असल्याची आवर्जून घोषणा करते.

मानव हा भौतिक जगतापेक्षा किती तरी अद्भुत आहे. त्याच्या बौद्धिक कौशल्याचा विचार करा. तो कारणमीमांसा करू शकतो. विश्वास करू शकतो. प्रेम करतो, स्वप्न पाहू शकतो, योजना बनवू शकतो, तसेच परियोजनासुद्धा बनवू शकतो. काही लोकांचे चार ते पाच भाषांवर प्रभुत्व असते. शास्त्रज्ञ सांगतात की, जे सर्वांत उत्तम संगणक आम्ही बनवू शकतो, त्यापेक्षाही मनुष्याच्या डोक्यातील (मेंदूतील) एक पेशी जटिल आहे.

मानवाच्या आत्मिक स्वभावाचा विचार करा, सुरुवातीपासूनच मनुष्य हा अपराध/गुन्हे करणारा प्राणी राहिला आहे. जुन्या काळी लोक आसमंतातील कोणत्या तरी शक्तींची पूजाअर्चना करण्याची आवड ठेवायचे. मनुष्याला आपल्या अंतःकरणात

कमी वाटते, त्याच्या मनामध्ये सद्सद्‌विवेक बुद्धी आहे. अनेक वेळेस तो अधिक स्पष्ट नाही परंतु तो नेहमीच अस्तित्वात असतो.

मनुष्याच्या शारीरिक रचनेचा विचार करा. आपण मानवाच्या एकट्या अवयवांचा अभ्यास करण्यासाठी पूर्ण जीवनभर अभ्यास केला तरीसुद्धा होऊ शकत नाही.

जीवनाबद्दल विचार करा, आपण त्याची रचना करू शकत नाही किंवा मरणोत्तर फिरून जिवंत होऊ शकत नाही. आपण त्याची चांगल्या प्रकारे व्याख्या करू शकत नाही, किंवा त्याला पूर्णपणे आपल्यात वश करू शकत नाही. मनुष्याची आश्चर्यजनक रचना त्याच्या उत्पन्नकर्त्याच्या अस्तित्वाची घोषणा करते.

विचार करा की आपण एखाद्या प्रसिद्ध प्राध्यापकांच्या वर्गात, जीवनाचा उगम या विषयावर भाषण ऐकत आहोत. तो शास्त्रीय शब्दावली आणि त्यासाठी व्याख्यांना सोडून ज्याचा त्याने उपयोग केला आणि संक्षिप्त रूपात सांगतो, सुरुवातीला एक प्रकारची एक पेशी होती व त्यामध्ये जीवनाचा अंश होता. मग त्या पेशी वाढत गेल्या व अनेक झाल्या. त्यामधून एक समूह जीव जन्माला आला. मग ते अनेक जीव झाले, आणि विकसित झाले. करोडो वर्षांनंतर ते जीव मनुष्याच्या रूपात विकसित झाले.

प्राध्यापकाचे भाषण ऐकून आपल्या मनात तीन प्रश्न उद्‌भवतात, ज्यांची उत्तरे त्याच्या पद्धतीने देता येत नाहीत. तो असे प्रश्न सोडून देतो, जसे त्यासाठी त्या प्रश्नांचा काही उपयोग नाही, आणि त्याबद्दल बोलणेसुद्धा व्यर्थ. परंतु या प्रश्नाबरोबर त्याचा व्यवहार, त्याच्या पद्धतीला स्वीकारणे अशक्य आणि तर्कसंगत वाटत नाही. पहिला प्रश्न जीवनाच्या प्रारंभाबद्दलचे स्पष्टीकरण आहे. त्याच्या पद्धतीनुसार जीवन शून्यातून निर्माण झाले. कोणतीही व्यक्ती यावर विश्वास ठेवणार नाही की एखादे पुस्तक शून्यातून बनविले गेले किंवा रेडिओ विस्फोटातून तयार झाला. मग जीवन हे पुस्तक किंवा रेडिओपेक्षा जटिल आहे. माणूस पुस्तक किंवा रेडिओ तर तयार करू शकतो, परंतु जीवनाची रचना करू शकत नाही; तरीसुद्धा प्राध्यापक आम्हांला हा विश्वास ठेवावयास लावतात की जीवन हे शून्यापासून झाले.

दुसरा प्रश्न नैसर्गिक नियमांच्या अस्तित्वाच्या व्याख्येबद्दलचा आहे. प्राध्यापकाच्या पद्धतीनुसार निसर्गाचे नियम हेसुद्धा शून्यातून तयार झाले. आमची ही सृष्टी निसर्गाच्या नियमाने चालते. जर आपल्या शरीराला जेवण मिळत नाही किंवा आपण जेवण करत नाही, तर आपण एक दिवस मराल. आपण या नियमांचे उल्लंघन करू शकत नाही. तसेच मृत्यूच्या नैसर्गिक नियमावर मात करू शकत नाही. मानव जीवनाचे नाश होणे शंभर टक्के खरे आहे. त्याला कोणताच अपवाद नाही. प्राध्यापक आपल्या सिद्धांतातून

हे समजावण्याचा प्रयत्न करीत आहे की, नैसर्गिक नियम आपल्या आपणच (आपोआपच) नियमित झाले.

तिसरा प्रश्न हा कुटुंबाचे अस्तित्व नसेल. प्राध्यापकाच्या सिद्धांतानुसार तो आम्हांस विश्वास ठेवावयास लावतात की पुरुष त्याच वेळेस पूर्णपणे विकसित झाला. ज्या वेळेस पूर्णपणे विकसित झाली होती. अचानक त्यांना एकमेकांसोबत राहून चांगले वाटू लागले व अशा प्रकारे कौटुंबिक पद्धती निर्माण होऊन आपणांस जुन्या इतिहासापासून माहीत आहे. पुरुष हा स्त्रीपेक्षा वेगळा आहे आणि स्त्री ही पुरुषांपेक्षा वेगळी तरीसुद्धा ते एकमेकांस अनुरूप आणि एकमेकांसाठी एकसारखे असे आहे. प्राध्यापकाचे सांगणे आहे की, ते दोघे एकाच वेळेस पूर्णपणे विकसित झाले आणि कुटुंब बनवून राहू लागले. एका वेगळ्या शब्दामध्ये तो पुरावा देतो की, कुटुंब शून्यातून निर्माण झाले, ते अकस्मात निर्माण झाले आहे.

आपले मन आपल्याला हे स्वीकारण्यासाठी बिलकुल परवानगी देत नाही की, जीवनाची निर्मिती शून्यातून झाली, नैसर्गिक नियम शून्यातून बनले व मानवी कुटुंबसुद्धा शून्यातूनच निर्माण झाले. मानवाच्या अस्तित्वाबद्दलचा एकुलता एक तर्कसंगत मार्ग या समजुतीतून स्पष्टीकरण देतो की, एका सर्वशक्तिशाली हाताने त्याची रचना केली आहे आणि त्याला एका विशिष्ट कारणासाठी पृथ्वीवर ठेवले आहे.

कारणमीमांसेतून आपण जो निष्कर्ष काढला की, पवित्र शास्त्राच्या पहिल्या अध्यायात सांगितले आहे की, ''मग देव बोलला, 'आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण करू;...''' (उत्पत्ती १:२६) पवित्र शास्त्रानुसार मानवाचे शरीर देवाच्या जीवनापासून बनवले आहे. आम्हांला अधिक नंतर सांगितले गेले आहे, देवाने आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य निर्माण केला, देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला, नर व नारी अशी ती निर्माण केली. देवाने त्यांस आशीर्वाद दिला, देव त्यांस म्हणाला, फलद्रूप व्हा, बहुगुणी व्हा, पृथ्वी व्यापून टाका व ती सत्तेत आणा, समुद्रातील मत्स्य, आकाशांतील पक्षी व पृथ्वीवर संचार करणारे सर्व प्राणिमात्र यांवर सत्ता करा (उत्पत्ती १:२७,२८). परमेश्वराने मनुष्याला स्वतःच्या प्रतिरूपाप्रमाणे आत्मिक स्वरूप दिले. त्याने मानवजातीमध्ये नर व नारी बनवून एका कुटुंबाची स्थापना केली. परमेश्वराने पृथ्वीला चालविण्यासाठी नैसर्गिक नियम घालून दिले.

कारणमीमांसा मागणी करते की, मानवीय जीवन हे एक सर्वशक्तिशाली हाताने दैवी उद्देशाने बनवले आहे. निःसंकोचपणे आपण म्हणू शकतो की, माझ्या मनाचा स्वामी तू आहेस, तूच माझे अंतर्भाव निर्माण केले. तूच माझ्या आईच्या उदरी माझी

घटना केली. भयजनक व आश्‍चर्यजनक रीतीने माझी घटना झाली आहे. तुझी कृत्ये अदभुत आहेत हे माझा जीव पूर्णपणे जाणून आहे (स्तोत्र.१३९:१३,१४).

एकदा मिशनरी म्हणाले, ‘‘मी जगाच्या पाठीवरील अनेक देशांची भ्रमंती केली, आणि प्रत्येक देशात एकसारखाच अनुभव आला. उदाहरणादाखल जेव्हा मुलांना दोन आणि दोन चार होतात असे शिकवले जाते, तेव्हा त्यांची प्रतिक्रिया ही एकसारखीच असते. ते सर्व यांवर विचार करतात आणि एका निष्कर्षावर जातात की ते बरोबर आहे. त्यांच्यामध्ये काही तरी असते जे या विचारांना त्यांच्यापर्यंत पोहचवत असते, आणि ते त्यांना सत्य समजतात. याच प्रकारे जगातील वेगवेगळ्या देशांतील लोकांना शिकवले जाते की, परमेश्‍वराने सृष्टीची व मनुष्याची निर्मिती केली. याबद्दल ते विचार करतात आणि नंतर निष्कर्ष काढतात की तेच सत्य आहे. त्यांच्या मनामध्ये काही तरी आहे, जे त्यांना त्या शिक्षणापर्यंत पोहचवते आणि त्याला खरे मानण्यात येते. मी जेथे कोठे गेलो, त्या प्रत्येक जमातीमध्ये व प्रत्येक देशामध्ये मला अशीच प्रतिक्रिया पाहावयास मिळाली आहे.’’

जर आपण मनुष्याचे अस्तित्व, त्याचे जीवन, त्याची वृद्धी, त्याचा आत्मिक स्वभाव, त्याचा सदसद्विवेक आणि त्याची शारीरिक रचना यांवर विचार कराल तर निश्‍चितच आपण या निष्कर्षावर पोहचाल की, तो असाच अस्तित्वात आला नाही, परंतु त्याला कोणी सर्वशक्तिशाली हाताने निर्माण केले. तुम्ही ठामपणे सांगू शकता की परमेश्‍वर खरोखरच अस्तित्वात आहे, मनुष्याचे अस्तित्व त्याचे होण्याचे प्रमाण आहे.

## सारांश

ज्या दोन प्रमाणांवर आपण लक्ष दिले आहे, त्याबद्दल आपण खोलवर विचार करू. सृष्टीचे प्रमाण आणि मानवाचे प्रमाण जो निष्कर्ष यावरून निघायला पाहिजे तो अटळ आहे, आणि तो अमान्य करता येणे शक्य नाही. म्हणून पवित्र शास्त्र म्हणते, ‘‘मूर्ख आपल्या मनात म्हणतो, देव नाही’’ (स्तोत्र.१४:१).

हा विश्‍वास करणे कारणीभूत आहे की ज्या परमेश्‍वराने आम्हांला निर्माण केले, तो एक दिवस आम्हांला त्याच्यासमोर बोलावील आणि आम्ही आमच्या जीवनांत जे काही केले त्याचा हिशेब आम्हा सर्वांकडून मागेल. परमेश्‍वराने येशू ख्रिस्ताला या जगात पाठविले आणि पवित्र शास्त्र आम्हांस दिले. आम्ही या जगात का आलो व तो आमच्यापासून काय अपेक्षा करतो हे आम्ही समजून घ्यावे अशी त्याची इच्छा आहे येशूने म्हटले, ‘‘जो मला अव्हेरितो व माझ्या वचनाचा स्वीकार करीत नाही त्याचा

न्याय करणारा एक जण आहे जे वचन मी सांगितले तेच शेवटच्या दिवशी त्याचा न्याय करील'' (योहान १२:४८).

आश्चर्यकारक सत्य हे आहे की, जे येशू व पवित्र शास्त्र आपल्याला प्रकट करते ते हे की परमेश्वर आम्हांला दत्तक घेऊन आपले लेकरू बनवू पाहतो. तो जो ज्याने सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी आणि सर्व सृष्टीची निर्मिती केली, मला आपल्या कुटुंबात सदासर्वकाळ राहण्यासाठी त्याची बोलावण्याची इच्छा आहे. त्याने आपल्या पुत्राच्या शुभवर्तमानाच्याद्वारे मला आपल्या कुटुंबात आमंत्रित करतो, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे, पापांपासून मन फिरविणे, येशूला स्वीकारणे, ख्रिस्ताच्या शरीरात बाप्तिस्मा घेऊन त्याच्या शुभवर्तमानाची गोष्ट मान्य करून मला त्याच्या आत्मिक कुटुंबात दत्तक घेतले जाते (इफिस.१:५, गलती.४:६). पवित्र शास्त्रानुसार आपण एवढेच जाणू शकत नाही की, परमेश्वर खरोखरच आहे आणि हेसुद्धा ज्ञात होईल की खरंच तुम्ही त्याची लेकरे आहात.

## अभ्यासासाठी प्रश्न

*(उत्तरे पृष्ठ 228 वर आहेत)*

१. कोणीही विचारू शकेल असा सर्वांत सखोल प्रश्न कोणता?
२. ''परमेश्वराचे अस्तित्व आहे काय?'' हा प्रश्न इतका सखोल का आहे?
३. पवित्र शास्त्राची सुरुवात कशाने होते?
४. आम्हांला देवावर विश्वास ठेवण्यास भाग पाडणारा पहिला पुरावा कोणता?
५. मानवाच्या अस्तित्वाच्या स्पष्टीकरणाबाबत देवाला नाकारणाऱ्या माणसासमोर कोणत्या तीन समस्या उभ्या राहतात?

## ‘सृष्टीचा निर्माणकर्ता’ की संयोग?

‘न्यूयॉर्क स्टेट ॲकॅडमी ऑफ सायन्स’ चे माजी प्रेसिडेन्ट, डॉक्टर ए. क्रेसी, मॉरिसन यांनी म्हटले,

> प्रत्येक गोष्टीच्या मागे एक प्रयोजन असते हे ठामपणे सांगणारा हा पुरावा आहे .... जग योग्य ठिकाणी आहे, पृथ्वीच्या कवचाची जाडी योग्य प्रमाणात आहे, समुद्राची खोली आतापेक्षा काही फूट जास्त असती तर आपल्याला ऑक्सिजन किंवा वनस्पती मिळाली नसती हे आमच्या लक्षात आले आहे. पृथ्वी स्वतःभोवती २४ तासांत एक प्रदक्षिणा करते, पण या प्रदक्षिणेला थोडा अधिक वेळ लागला तर जीवन अशक्य झाले असते पृथ्वीची सूर्याभोवती फिरण्याची गती कमी किंवा जास्त केली तर जीवनाचा इतिहास – जर काही असताच – अगदी वेगळा झाला असता. आपल्या पृथ्वीवरील जीवनासारखे जीवन शक्य करणाऱ्या हजारो सूर्यांपैकी आपला सूर्य एक आहे, त्याचा आकार, त्याची घनता, त्याचे तापमान, त्याच्या किरणांची तीव्रता हे सर्व योग्य असले पाहिजे आणि ते तसे आहे हे आमच्या लक्षात आले आहे. वातावरणातील वायू एकमेकांना अनुकूल आहेत, त्यात किंचितसा जरी फरक झाला तरी तो घातक ठरू शकतो हे आम्हांला समजले आहे....
>
> पृथ्वीचे वस्तुमान, अंतरीक्षातील तिचे स्थान, अतिशय सुंदर प्रकारे एकमेकांना अनुकूल असलेल्या सर्व गोष्टी या सर्वांचा विचार केला, तर यांपैकी काही गोष्टी अनुकूल होण्याची शक्यता दहा लाखांत एक असू शकते, आणि या सर्वच गोष्टी अनुकूल होण्याच्या शक्यतेची गणनाच करता येत नाही.... म्हणून या सर्व वास्तविकतांच्या अस्तित्वाची सांगड शक्याशक्यतांच्या कोणत्याही नियमाशी घालता येत नाही.... निसर्गातील या अद्भुत आश्चर्यांविषयी आपण विचार केला, तर त्यामागे निश्चितच काही संकल्पना, हेतू आहे हे स्पष्ट होते. आपण ज्याला देव म्हणतो त्याच्याकडून अमर्याद तपशिलासह एक कार्यक्रम राबवला जात आहे.

---

ए क्रेसी मॉरिसन, *मॅन डज नॉट स्टँड अलोन* (न्यू यॉर्कः फ्लेमिंग एच. रिवेल कं., १९४४), ९४,९५; बेटसेल बेरेट बॅक्स्टरमध्ये उदधृत, *आय बिलिव्ह बिकॉज...* (ग्रँड रॅपिड्स, मिशि.ः बेकर बुक हाऊस १९७१), ६६.